# मनमाड नगरपरिषद, मनमाड
## ता. नांदगाव जिल्हा नाशिक

फोन नं. ०२५९१ - २२२३२८ Email - comanmad@gmail.com

जा.क्र./मनपा/283/2018 दिनांक 23/09/2018

# आदेश:-

प्रति,

साई गणेश बिल्डकॉम
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक.

विषय :- मनमाड येथील सर्व्हे नं. 4/1 मधील 3750 चौ.मी. क्षेत्र वाणिज्य या कारणास्तव विकसन परवानगी बाबत....

संदर्भ :- 1)दिनांक :- 22/01/2016 रोजीचे महाराष्ट्र जमिन महसुल संहिता 1966 च्या कलम 42- अ (१) (अ) मधील तरतुदीकान्वये.
2)मा.तहसिलदार सो. नांदगाव यांचे कडेस दाखल जा.क्र. 1456 दि. 1/7/2017 अन्वये पाठविलेले पत्र.
3)तहसिल कार्यालय नांदगाव यांचे कार्यालया कडिल जा.क्र. 356 दि. 14/11/2017 चे पत्र.

श्री. ए.आर.शिन्दे वाकुंज व ए.आर. शिन्दे वाकुंज (आर्किटेक्ट) रा.नाशिक यांनी सर्व्हे नं. 4/1मध्ये वाणि उपयोगासाठी नविन इमारतीचे बांधकाम नकाशास मंजुरी मिळणे साठी सादर केलेला प्रस्ताव तांत्रिक दृष्ट्या सर्वसाधारणप योग्य असल्यामुळे संदर्भ क्र.2 नुसार तहसिल कार्यालय नांदगाव यांचे कार्यालयाकडुन जमिनीचा भोगवटा,वर्ग व भार याच्या विनिश्चितीबाबतचे प्रमाणपत्र मिळणे कामी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. संदर्भ क्र. 3 अन्वये तहसिल कार्यालय नांदगा यांचेकडुन जमिनीचा भोगवटा,वर्ग व भार याच्या विनिश्चितीबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयाकडेस प्राप्त झालेले आहे. संद क्र. 1 नुसार आपणास महाराष्ट्र जमिन महसुल संहिता 1966(दुसरी सुधारणा) अधिनियम 2014 (महाराष्ट्र अधिनिय 37/2014) मधील तरतुदीयान्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 42-अ (1) ( अन्वये वाणिज्य उपयोगासाठी विकसन परवानगी खालील अटीस अधिन राहुन देण्यात येत आहे.

अटी:-

1) सदर बिनशेती सारा हा दर दिनांक 1/8/2016 नंतर लागु होणाऱ्या सुधारीत दरानुसार बदलण्यास पात्र राहील.
2) मनमाड नगरपरिषदेकडुन विकसनाची परवानगी मिळाल्यानंतर अर्जदार यांनी ज्या दिनांकापासुन जमिनीच्या वापरामध्ये बदलास सुरुवात केली असेल त्या दिनांकापासुन 30 दिवसाच्या आत त्याबाबत [illegible]

4) सदरच्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत संबधित जमीनमालक जबाबदार राहील. याबाबत महसूल विभाग/अधिकारी जबाबदार राहणार नाही.

5) प्रस्तुत ना – हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतरही सदर जमीन वतन/भोगवटदार वर्ग-2 संवर्गातील असल्याचे सिध्द झाल्यास व त्यापोटी प्रचलित नियमाध्दारे नजराणा/अर्जित रक्कमेतील विशीष्ट हिस्सा शासनास देय होत असल्याचे सिध्द झाल्यास अशा रकमेची वसुली ही बाब निदर्शनास येईल. त्यावेळेच्या चालु बाजारमुल्याचे आधारे तत्कालिन जमीन धारकाकडुन /मालकाकडुन कसुर केलेस ती जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे सक्तीने वसुल करण्यात येईल.

6) अर्जदार यांनी सदर जमीनीबाबत दिलेली माहिती चुकिची आढळल्यास सदरचे प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

7) प्रस्तुत मिळकतीची मालकी व वापर अनुज्ञेयता याबाबत अर्जदार व संबधित स्थानिक स्वराज्य संस्था यांची जबाबदारी राहील.

8) सदरील जागा विकसन करतांना प्रचलित इमारत नियमावलीनुसार पार्कींग साठी नियमानुसार सोडावी लागणारी जागा सोडणे आवश्यक राहील. तसे न केल्यास सदरचे प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

9) सदरील वाणिज्य वापरासाठी आपणास देण्यात येणारी परवानगी ही अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मालेगाव यांचे कडिल संदर्भ क्र.4 अन्वये सदरील जमिनीचा वर्ग भोगवटादार वर्ग-1 याबाबतचा ना हरकत दाखला प्राप्त झालेल्या असल्या कारणास्तव देण्यात येत आहे.

10)सदरील जागेत कुठलेही व्यवसाय करणेपूर्वी नगरपरिषदेकडुन रीतसर व्यवसाय ना हरकत दाखला/ परवानगी घेतल्यानंतरच व्यवसाय सुरु करावे.

11)भुमिअभिलेख कार्यालय नांदगाव यांचे कडुन जमिनीची रीतसर मोजणी करुन घेतल्यानंतरच जागेत विकसन सुरु करावे.

MANMAD MUNICIPAL COUNCIL MANMAD

मुख्याधिकारी
मनमाड नगरपरिषद, मनमाड

प्रत:- 1) सहा. संचालक नगररचना नाशिक विभाग, नाशिक.
2)तहसिलदार,नांदगाव यांचेकडेस माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
3)उपअधिक्षक भुमि अभिलेख,नांदगाव यांचेकडेस माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
4) तलाठी,मनमाड,ता. नांदगाव जि. नाशिक यांचेकडेस माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.